**<u>विशेष दिवाणी दावा क्र. १२/२०२१</u>**

*CNR No. MHSO060000212021*

मंगल केराप्पा निर्मळ

वि.

सावित्रा मारुती उन्हाळे वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. ५ वर</u>

या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १, ५, ८ आणि ९ यांनी दावा मिळकतवरील वादी तसेच प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्या अविभक्त मालकी, सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य करु नये तसेच संपादीत क्षेत्राचा मावेजा रकमेचे वाटप करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम वादी यांनी मागितला आहे.

प्रकरणाची संक्षीप्त हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

०२. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ४१११/१ क्षेत्र ० हे. ८१ आर आकार ३ रु. २० पैसे आणि गट नं. ४१११/२ क्षेत्र २ हे. ४५ आर आकार ९ रु. ७५ पैसे तसेच मेटकरी गल्ली, मंगळवेढा येथील घरजागा सि.स.नं. ४२२० या मिळकती या दाव्यातील वादविषय आहेत. संक्षेपासाठी येथून पुढे त्यास 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

०३. वादी यांचे वडील मारुती पांडुरंग उन्हाळे यांच्या प्रतिवादी क्र. ७ मुक्ता या कायदेशीर पत्नी आहेत. मारुती यांना प्रतिवादी क्र. ७ मुक्ता यांचेपासून वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ बाई आणि प्रतिवादी क्र. ६ लता अशी अपत्ये झाली. वादी तसेच प्रतिवादी क्र. ६ लता या विवाहीत आहेत. प्रतिवादी क्र. ५ बाई या मुकबधीर आहेत. त्यामुळे त्यांचा विवाह झाला नाही. प्रतिवादी क्र. ५ बाई या वडील मारुती यांचेसोबत रहात होत्या. मारुती हे दिनांक ०३/०९/२०२० रोजी कोविड–२०१९ या आजारामुळे मयत झाले आहेत.

०४. मारुती यांना प्रतिवादी क्र. ७ मुक्ता यांचेपासून तीन मुली झाल्या. पुरुष संतती व्हावी यासाठी मारुती यांनी प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांचेसोबत सन १९७५ पासून विवाहबाह्य संबंध ठेवले. त्यांना मंगळवेढा येथे घरी आणून ठेवले. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ मुक्ता, मयत मारुती व प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांचे दरम्यान वाद निर्माण झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र. ७ मुक्ता या त्यांचे मामाकडे फाटेवाडी, ता. मंगळवेढा येथे राहू लागल्या. वादी व प्रतिवादी क्र. ६ लता या मारुती यांचेसोबत रहात होत्या. मारुती यांना प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांचेपासून प्रतिवादी क्र. २ सविता, प्रतिवादी क्र. ३ माधुरी आणि प्रतिवादी क्र. ४ शितल अशा मुली झाल्या. प्रतिवादी क्र. २ ते ४ या मारुती यांच्या अनौरस संतती आहेत. प्रतिवादी क्र. ७ मुक्ता या मयत मारुती यांच्या कायदेशीर पत्नी आहेत. प्रतिवादी क्र. १ सावित्रा या रखेल असल्यामुळे त्यांना दावा मिळकतमध्ये कोणताही कायदेशीर हक्क अथवा अधिकार नाही.

०५. दावा मिळकती या मयत मारुती यांनी त्यांचे कुटुंबाच्या एकत्र श्रमातून सन १९६६ साली खरेदी घेतल्या आहेत. वादी व प्रतिवादी क्र. २ ते ७ हे दावा मिळकतीचा सामाईकात उपभोग घेत आहेत. त्या मिळकतीमध्ये मारुती यांचे पश्चात वादी यांचा १/४ हिस्सा आहे. तर प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा १/३५ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांना दावा मिळकतमध्ये कोणताही अधिकार नाही.

०६. सन २००६ साली हिंदू वारस कायद्यामध्ये सुधारणा झाली. मुलींना वडिलांच्या मिळकतमध्ये मुलांसारखा जन्मजात अधिकार प्राप्त झाला आहे. प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांची माहेरची कौटुंबित परिस्थिती बेताची होती. त्यांना माहेरुन कोणतीही मदत नव्हती. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नव्हते. प्रतिवादी क्र. ५ बाई या मुकबधीर व गतीमंद आहेत. त्यांना घरकामा व्यतिरीक्त कोणतेही काम करता येत नाही. त्यांना देखील स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नव्हते. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे संपुर्णपणे मयत मारुती यांचे उत्पन्नावर अवलंबून होते.

०७. सन २००८–०९ मध्ये मारुती यांना अर्धांगवायुचा झटका आला होता. त्यामुळे त्यांच्या स्मरणशक्तीवर परीणाम झाला होता. बोलण्यातही दोष निर्माण झाला होता. औषधोपचारासाठी मारुती हे त्यांच्या उत्पन्नातून खर्च करत होते. वादी व प्रतिवादी क्र. ६ लता या देखील मारुती यांना औषधपाण्यासाठी मदत करत होत्या. आजारी असल्यामुळे मारुती यांचेवर प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांचा गैरवाजवी प्रभाव होता. त्याचा वापर करुन प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांनी प्रतिवादी क्र. ५ बाई यांचेशी संगनमत करुन कर्ज काढण्यासाठी कागदपत्रे तयार करावयाची आहेत असे मारुती यांना सांगितले. फसवून मारुती यांचेकडून दिनांक ०७/०१/२००९ रोजी खरेदीखताचे एकूण तीन दस्त करुन घेतले. त्या आधारे दावा मिळकत क्र. १ ही प्रतिवादी क्र. ५ बाई यांचे नावावर तर दावा मिळकत क्र. २ आणि ३ या प्रतिवादी क्र. १ सावित्रा यांचे नावावर बोगस खरेदीखताने करुन घेतल्या. त्याची माहिती वादी, प्रतिवादी क्र. ६ आणि ७ यांना होऊ दिली नाही. सदर दस्त हा विनामोबदला आहे. तो बेकायदेशीर आहे. दावा मिळकत विक्री करण्याची मयत मारुती यांना कोणतीही कायदेशीर गरज नव्हती. दावा मिळकतमध्ये वादी यांचा जन्मजात अधिकार आहे. सदर खरेदीखते ही वादी यांचे हिश्यावर बंधनकारक नाहीत.

०८. प्रतिवादी क्र. ६ लता यांना प्रस्तुत खरेदीखताची माहिती जुलै २०११ मध्ये झाली. त्यामुळे त्यांनी मंगळवेढा येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा नं. १७०/२०१२ हा दावा दाखल केला. तांत्रीक कारणास्तव तो दावा फेटाळण्यात आला. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ लता यांनी मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर यांचे न्यायालयात नियमित दिवाणी अपील नं. ९२/२०१८ हे दाखल केले. ते अपील प्रलंबित आहे.

०९. दावा मिळकत लगत असलेल्या रत्नागिरी ते नागपूर या राजरस्त्याचे चौपदरीकरण करण्याचे शासनाने ठरवले आहे. त्यासाठी दावा मिळकतचे काही क्षेत्र संपादीत केले. त्याची नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया सुरु आहे. वादी यांनी याबाबत तक्रार अर्ज

दिलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व ५ या प्रतिवादी क्र. ८ यांचे कर्मचारी यांचेशी संगनमत करुन नुकसान भरपाई रक्कम मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादी यांचे हक्कावर गदा येईल. त्यामुळे या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत दावा मिळकतवरील वादी तसेच प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्या अविभक्त मालकी, सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य करु नये तसेच बेकायदेशीरपणे संपादीत क्षेत्राचा मावेजा रकमेचे वाटप करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम वादी यांनी मागितला आहे.

१०. प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ५ हे त्यांचे वकील श्री. एम. एस. बडोदकर यांचेमार्फत हजर झाले. त्यांनी निशाणी क्र. ३५ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे.

११. प्रतिवादी क्र. ६ व ७ हे त्यांचे वकील श्री. व्ही. डी. देशमुख यांचेमार्फत प्रकरणात हजर झाले. त्यांनी कैफियत तसेच तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दिले नाही. त्यामुळे त्यांचे कैफियत व म्हणणे शिवाय प्रकरण पुढे चालवण्याचा आदेश करण्यात आला आहे.

१२. प्रतिवादी क्र. ८ ते १० हे सरकारी वकील यांचेमार्फत प्रकरणात हजर झाले. त्यांनी निशाणी क्र. ५१ प्रमाणे कैफियत व तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे.

१३. प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ५ यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर आक्षेप नोंदवला आहे. दावा मुदतीत नाही. यापुर्वी मंगळवेढा येथील मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात निकाली झालेल्या प्रकरणाचा तपशील वादी यांनी लपवून ठेवला आहे. या वादविषयाबाबत प्रतिवादी क्र. ७ मुक्ता आणि प्रतिवादी क्र. ६ लता यांनी मंगळवेढा येथील न्यायालयामध्ये या प्रकरणातील वादी व प्रतिवादी यांचे विरुध्द नियमित दिवाणी दावा नं. १७०/२०१२ दाखल केला होता. या प्रकरणातील वादी या सदर दाव्यामध्ये

प्रतिवादी क्र. ७ होत्या. त्यांनी त्या प्रकरणामध्ये कैफियत व प्रतिदावा दाखल केला होता. त्याबाबतचा स्वतंत्र मुद्दा देखील निश्चित करण्यात आला होता. गुणदोषावर प्रस्तुत दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय झाला आहे. त्यामध्ये वादी यांना दावा मिळकतमध्ये कोणताही हिस्सा नाही असे जाहीर करण्यात आले आहे. त्या प्रकरणाचे विरुध्द प्रतिवादी क्र. ७ मुक्ता यांनी केलेले अपील नियमित दिवाणी अपील नं. ९२/२०१८ हे मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर यांचे न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे त्याच वादविषयाबाबत हा दावा चालू शकत नाही.

१४. दावा मिळकती या मारुती यांनी स्वतः खरेदी घेतल्या आहेत. त्यामुळे त्या मिळकतमध्ये वादी यांचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही. कायदेशीर गरजेसाठी मयत मारुती यांनी प्रतिवादी क्र. १ व ५ यांना दावा मिळकत विक्री केली आहे. याबाबत शपथेवर जबाब मयत मारुती यांनी मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंगळवेढा यांचे न्यायालयात दिला आहे. खरेदीपासून प्रतिवादी क्र. १ व ५ यांचा दावा मिळकतमध्ये कब्जा आहे. प्रतिवादी क्र. ५ बाई या वादी यांच्या सख्खी बहीण आहेत. तिला बोलता येत नाही. तिची समजण्याची व मानसिक स्थिती उत्तम आहे. इच्छेनुसार दावा मिळकतची विक्री करण्याचा मारुती यांना अधिकार आहे. दावा मिळकतमध्ये वादी यांचा कोणताही हक्क नाही. संपादनासाठी मिळणारी रक्कम वादी यांना देता येणार नाही. सदर रक्कम प्रतिवादी यांना मिळू नये यासाठी वादी यांनी मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर येथील न्यायालयात नियमित दिवाणी अपील नं. ९२/२०१८ मध्ये अर्ज दिला होता. तो अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई हुकूम देता येणार नाही असे त्यांनी नमूद केले.

१५. प्रतिवादी क्र. ८ ते १० यांनी निशाणी क्र. ५१ प्रमाणे त्यांचे म्हणणे दिले आहे. दावा मिळकत रस्ता रुंदीकरणासाठी संपादीत करण्यात आली आहे. हितसंबंधीत व्यक्ती यांची पडताळणी करुन पात्र व्यक्तींना मोबदला देण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांना आहे. त्या आदेशाविरुध्द अपील करण्याची तरतुद आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ८ ते १० यांचेकडे तक्रार दिली आहे. त्यावर अद्याप चौकशी चालू आहे. त्यामुळे हा दावा चालू

शकत नाही. सबब तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

१६. वादी यांचे वकील श्री. बी. ए. बहिरट व प्रतिवादी क्र. १ व ५ यांचे वकील श्री. एम. एस. बडोदकर यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांनी केलेली कथने, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले. या अर्जाच्या अंतिम व योग्य निर्णयासाठी मी पुढीलप्रमाणे मुद्दे निश्चित केले. त्यावरील माझे उत्तर मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| | <u>मुददे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|---|
| १. | वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |
| ३. | प्रस्तावित तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>**

१७. दावा मिळकत ही मारुती यांनी सन १९६६ साली खरेदी घेतली आहे असे वादी यांनी दावा निशाणी क्र. १ मध्ये नमूद केले आहे. ती मिळकत दिनांक ०७/०१/२००९ रोजी मारुती यांनी प्रतिवादी क्र. १ सावित्रा आणि प्रतिवादी क्र. ५ बाई यांना विक्री केली आहे. त्यानंतर दावा मिळकतचा काही भाग रस्ता रुंदीकरणासाठी संपादीत झाला. त्याचा मावेजा देण्याची प्रक्रिया प्रतिवादी क्र. ८ ते १० यांचेकडे चालू आहे. प्रतिवादी

क्र. १ सावित्रा यांनी अवाजवी दबाव (undue influence) वापरुन नमूद खरेदीखत मयत मारुती यांचेकडून करुन घेतले आहे. दावा मिळकतमध्ये वादी यांचा जन्मजात हक्क आहे असे वादी यांचे कथन आहे.

१८. त्याच बाबतीत प्रतिवादी क्र. ६ लता आणि प्रतिवादी क्र. ७ मुक्ता यांनी मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंगळवेढा यांचे न्यायालयात या प्रकरणातील दावा मिळकतचे वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळावा अशी मागणी नियमित दिवाणी दावा नं. १७०/२०१२ प्रमाणे केली होती. या प्रकरणातील वादी या प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. ७ होत्या. त्यांनी त्या दाव्यामध्ये कैफियत व प्रतिदावा दाखल करुन त्यांचाही दावा मिळकतमध्ये हिस्सा मागितला होता. नियमित दिवाणी दावा नं. १७०/२०१२ च्या न्यायनिर्णयाची सर्टीफाईड प्रत प्रतिवादी यांनी रेकॉर्डवर दाखल केली आहे. त्या प्रकरणामध्ये दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत काय ? असा वादमुद्दा निश्चित करण्यात आला होता. विशेष म्हणजे खरेदी देणार मयत मारुती हे त्या प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १ होते. सदर मिळकती या मयत मारुती यांचे कष्टार्जित मिळकती आहेत. वादी व इतर प्रतिवादी यांना हक्कापासून वंचीत ठेवण्यासाठी सदर खरेदीखत मारुती यांनी करुन दिले ही बाब वादी यांनी सिध्द केलेली नाही. या दाव्यातील वादी तसेच प्रतिवादी क्र. ६ व ७ यांना दावा मिळकतमध्ये कोणताही हक्क नाही अशा स्पष्ट निष्कर्षासह प्रस्तुत दावा व या प्रकरणातील वादी यांनी केलेला प्रतिदावा खर्चासह नामंजूर करण्यात आला आहे. त्या विरुध्द अपील दाखल करण्यात आले आहे. परंतु त्यामध्ये कोणताही स्थगिती आदेश नाही.

१९. संपादीत जमिनीचा मावेजा प्रतिवादी क्र. १ व ५ यांना देऊ नये याबाबत नियमित दिवाणी अपील नं. ९२/२०१८ मध्ये नमूद प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी दिला होता. तो अर्ज मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर यांनी नामंजूर केला आहे.

२०.		दावा मिळकत ही मयत मारुती यांनी खरेदी केलेली मिळकत आहे. त्यांनी त्याची विक्री दिनांक ०७/०१/२००९ रोजी प्रतिवादी क्र. १ व ५ यांना केली आहे. सक्षम दिवाणी न्यायालय यांनी वादी यांना दावा मिळकतमध्ये कोणताही हक्क नाही असा गुणदोषावर न्यायनिर्णय दिला आहे. त्यामुळे दावा मिळकतमध्ये वादी यांचा प्रथमदर्शनी कोणताही हक्क व हितसंबंध दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांच्या सामाईक कब्जा तसेच संपादीत जमिनीचा मिळणा–या मावेजाच्या मागणीबाबत वादी यांचे हक्कात कोणताही आदेश देता येणार नाही. त्यामुळे वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही असा निष्कर्ष मी नोंदवतो. त्यानुसार मुद्दा क्र. १ चे उत्तर मी 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

२१.		सन २००९ मध्ये प्रतिवादी क्र. १ व ५ यांनी दावा मिळकत खरेदी घेतली आहे. तेव्हापासून प्रतिवादी क्र. १ व ५ यांच्या ताब्यात दावा मिळकत आहे. वादी यांचा दावा मिळकतशी कोणताही हक्क अथवा हितसंबंध शिल्लक राहिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादी यांचे बाजुने नाही असे मी नमूद करतो. त्यानुसार मुददा क्र. २ चे उत्तर मी 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>** –

२२.		दावा मिळकतमध्ये वादी यांचा कोणताही हक्क दिसून येत नाही. दावा मिळकतमध्ये वादी यांचा समााईक ताबा असल्याबाबत कोणताही पुरावा वादी यांनी दिलेला नाही. तसेच संपादीत जमिनीचा मावेजा मिळण्याचा वादी यांचा कोणताही अधिकार प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे नमूद तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मुददा क्र. ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** –

२३. मुद्दा क्र. १ ते ३ च्या उत्तरानुसार वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने नाही. तसेच जर नमूद तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादी यांचे कोणतेही अपरिमीत नुकसान होणार नाही असे निष्कर्ष मी नोंदवले आहेत. सबब मुददा क्र. ४ च्या उत्तरासाठी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खुल्या न्यायालयात सर्वासमक्ष आदेश जाहीर केला.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.12.19 16:13:41 +0530

दि. १७/१२/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 19/12/2022 |
| Order uploaded on | : | 19/12/2022 |